सोमवार
१९
ऑक्टोबर २०२६

वर्ष १८ वे
अंक - २५४
पाने - ०४
किंमत - ४ रूपये

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

मे. माधव गंगाधर काजळे अँण्ड सन्स



MGK

नवरात्रीच्या
सर्व ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा !

दागिण्यांच्या खरेदीवर मिळवा
50% मजुरीवरती डिस्काऊंट



आमच्या असंख्य ग्राहकांना
विजयादशमीच्या
हार्दिक शुभेच्छा !

जुन्या दागिण्यांच्या मोडीवर
0% घट

सुवर्णसंचय योजना सुरु करा खरेदीच्या वेळेस
सोने बुकिंग सेवा उपलब्ध

शाखा क्र. 1 : अशोक चौक, संगमनेर,
मो. 9623363548

शाखा क्र. 2 : नवीन नगर रोड, जाणता राजा मैदान मार्ग,
पोफळे हॉस्पिटल शेजारी, संगमनेर,
मो. 9665825339

संपादकीय...

पुस्तकांपासून दूर जाणारी पिढी; विचारशक्तीचे काय?

वाचन हे माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे. पुस्तकांमधून माणसाला ज्ञान मिळते, विचार करण्याची दिशा मिळते आणि जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन विकसित होतो. मात्र, आजच्या डिजिटल युगात वाचनाची सवय कमी होत असल्याचे चित्र दिसत आहे. मोबाईल, सोशल मीडिया, यूट्यूब आणि इन्स्टाग्रामवरील रील्स यांमध्ये तरुणाईचा मोठा वेळ खर्च होत आहे. काही मिनिटांत मनोरंजन मिळत असले, तरी सखोल वाचनातून मिळणारे ज्ञान आणि विचारांची खोली यांची जागा त्यातून पूर्णपणे भरून निघत नाही. आज माहिती मिळवणे सोपे झाले आहे. कोणत्याही विषयाची माहिती काही सेकंदांत मोबाईलवर उपलब्ध होते. परंतु माहिती मिळणे आणि त्या माहितीचा योग्य अर्थ समजून घेणे यात फरक आहे. एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी, त्यातील विविध बाजू समजून घेण्यासाठी आणि योग्य निष्कर्ष काढण्यासाठी वाचन आवश्यक असते. केवळ मथळे वाचून किंवा काही सेकंदांचे व्हिडिओ पाहून विषयाचे संपूर्ण आकलन होऊ शकत नाही. त्यामुळे माहितीच्या वाढत्या उपलब्धतेबरोबरच विचार करण्याची क्षमता वाढते आहे का, याचाही विचार करणे गरजेचे आहे. वाचनामुळे माणसाची भाषा समृद्ध होते, शब्दसंग्रह वाढतो आणि स्वत:चे विचार स्पष्टपणे मांडण्याची क्षमता विकसित होते. इतिहास वाचल्याने भूतकाळातील घटनांची जाणीव होते. चरित्रे वाचल्याने संघर्ष, परिश्रम आणि यशाचा प्रवास समजतो. साहित्य वाचल्याने मानवी भावना, सामाजिक प्रश्न आणि नातेसंबंध यांचे आकलन होते. विज्ञानविषयक पुस्तके वाचल्याने प्रश्न विचारण्याची आणि पुराव्यांच्या आधारे विचार करण्याची सवय लागते. त्यामुळे वाचन हे केवळ परीक्षेत गुण मिळवण्यासाठी नसून जीवन समजून घेण्यासाठीही महत्त्वाचे आहे.

आज सोशल मीडियावर अनेक प्रकारची माहिती प्रसारित होते. त्यातील काही माहिती अपूर्ण, चुकीची किंवा दिशाभूल करणारी असू शकते. अशा वेळी प्रत्येक माहितीवर त्वरित विश्वास ठेवण्याऐवजी तिची सत्यता तपासणे आवश्यक असते. नियमित वाचन करणारी व्यक्ती एखाद्या विषयाची पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न करते. विविध मतांचा अभ्यास करून स्वत:चे मत तयार करण्याची क्षमता वाचनातून विकसित होते. स्वतंत्र विचारशक्ती आणि विवेकशील समाजनिर्मितीसाठी ही सवय महत्त्वाची आहे. वाचनाची गोडी लावण्याची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. पालकांनी मुलांना मोबाईलपासून दूर राहण्याचा सल्ला देण्याबरोबरच स्वत:ही वाचनासाठी वेळ दिला पाहिजे. घरात वर्तमानपत्रे, कथा, चरित्रे आणि ज्ञानवर्धक पुस्तके उपलब्ध असावीत. मुलांना त्यांच्या आवडीच्या विषयांवरील पुस्तके वाचण्यास प्रोत्साहन द्यावे. शाळांमध्ये वाचनाचे तास, पुस्तक परिचय, कथाकथन आणि वाचनस्पर्धा आयोजित केल्यास विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊ शकते. सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिकाही महत्त्वाची आहे. गावोगावी आणि शहरांमध्ये वाचनालये उपलब्ध असणे, त्यामध्ये नवीन पुस्तके असणे आणि विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी अनुकूल वातावरण मिळणे आवश्यक आहे. वाचनालये केवळ परीक्षेच्या तयारीपुरती मर्यादित न राहता सर्व वयोगटांसाठी ज्ञानाची केंद्रे बनली पाहिजेत. स्थानिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. डिजिटल माध्यमांचा वापर पूर्णपणे टाळणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. ई-पुस्तके, डिजिटल ग्रंथालये आणि ऑडिओबुक्स यांचाही वाचनासाठी चांगला उपयोग होऊ शकतो. मात्र, मनोरंजनासाठी मोबाईल वापरताना आणि ज्ञान मिळवण्यासाठी त्याचा वापर करताना फरक ओळखणे आवश्यक आहे. दररोज किमान वीस ते तीस मिनिटे वाचनासाठी राखून ठेवल्यास हळूहळू वाचनाची सवय विकसित होऊ शकते. वाचलेल्या विषयावर विचार करणे आणि इतरांशी चर्चा करणे यामुळे त्या ज्ञानाचा उपयोग अधिक चांगल्या प्रकारे करता येतो. समाजाची प्रगती केवळ आर्थिक विकासावर अवलंबून नसते, तर त्या समाजातील नागरिक किती जागरूक आणि विचारशील आहेत, यावरही अवलंबून असते. वाचनामुळे माणूस प्रश्न विचारायला शिकतो, मतभेद समजून घेतो आणि निर्णय घेताना विवेकाचा वापर करतो. म्हणूनच वाचनसंस्कृती जपणे ही केवळ वैयक्तिक आवड नसून सामाजिक जबाबदारी आहे. आज मोबाईलच्या पडद्यावर माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध असताना पुस्तकांचे महत्त्व कमी होऊ देणे योग्य ठरणार नाही. तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच वाचनाची सवय टिकवणे आवश्यक आहे. कारण पुस्तक माणसाला केवळ माहिती देत नाही, तर विचार करण्याची दिशा देते. वाचन कमी झाले, तर विचारांची खोली कमी होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच वाचनसंस्कृती जपणे म्हणजे विवेकशील, जागरूक आणि प्रगल्भ समाजाच्या निर्मितीचा पाया मजबूत करणे होय.

अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानामधून विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी - शरयूताई देशमुख



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. यावर्षी अलनिनोमुळे शेतीवर संकट आले आहे. मोठ्या कष्टातून शेतकरी अन्न पिकवत असून अन्नाची नासाडी प्रत्येकाने टाळली पाहिजे असे सांगताना शुद्ध व गुणवत्तेचे अन्न की प्रत्येकाची मोठी गरज असल्याने अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानातून विद्यार्थ्यांना भविष्यात करिअरच्या मोठ्या संधी असल्याचे प्रतिपादन अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख यांनी केले आहे. अमृतवाहिनीतील वसंतदादा क्रीडा संकुल येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय व अमृतवाहिनी फूड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित फूड एक्सपो २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी समवेत मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. व्हि.बी.धुमाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र वाघ, डॉ बी एम लोंढे, प्रा. जी.बी बाचकर, प्रा डॉ बी ए जाधव, शिवाजी जगताप, पालक प्रतिनिधी दिलीप कानकाडे, नामदेव गायकवाड, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

अमृतवाहिनीच्या क्रीडा संकुलात फूड एक्सपो मध्ये संगमनेर शहर तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यातील फूड प्रोसेसिंग असलेल्या ७० उद्योजकांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये खाद्यपदार्थ, फराळाचे पदार्थ, यांचे भव्य स्टॉल असून अमृतवाहिनीतील या फूड स्टॉलमुळे खवय्यांना मोठी मेजवानी मिळाली आहे. याप्रसंगी बोलताना सौ. शरयूताई देशमुख म्हणाल्या की, राज्याचे माजी कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कृषी महाविद्यालय व फूड टेक्नॉलॉजी महाविद्यालय सुरू करून विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील मोठ्या संधी निर्माण करून दिल्या आहेत. अमृतवाहिनी हे शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेचे मोठे नाव आहे. या दोन महाविद्यालयांमधून सुद्धा गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी संस्था पूर्ण प्रयत्न करत आहे. यावर्षी शेती संकटात आहे. शेतकरी दिवसभर शेतात राबतो आणि त्यातून मिळणाऱ्या पिकांमधून आपण अन्न खातो. म्हणून प्रत्येक घास खाताना शेतकऱ्याची आठवण करा. आपण चांगले अन्न खात असताना अनेक जण उपाशी आहे. याची काळजी करा .कुठेही अन्नाची नासाडी करू नका असा सल्ला त्यांनी दिला असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गुणवत्तेचे व शुद्ध खाद्यपदार्थ अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे आगामी काळात फूड टेक्नॉलॉजी, केटरिंग या क्षेत्रांमधून विद्यार्थी व युवकांना करिअरच्या शाश्वत संधी निर्माण झाल्या असल्याचे त्या म्हणाल्या. तर प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेल्या या दोन्ही महाविद्यालयांमधून गुणवत्तेमुळे प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण व प्रात्यक्षिक मिळावे याकरता महाविद्यालयातून पूर्ण प्रयत्न केले जात आहे. जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला लक्षात ठेवा असे सांगताना सार्वजनिक कार्यक्रमांमधून अनेक ठिकाणी अन्नाची नासाडी होत असून ही अन्नाची नासाडी टाळण्याकरता कृषी व अन्न प्रक्रिया महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी समाजामध्ये अधिक जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी केले.

संत ज्ञानेश्वर विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

नान्नज दुमाला - श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमापूजनाने झाली. शाल्वी गायकवाड व कार्तिकी नेटके यांनी सुरेल ग्रंथगीत सादर केले. साईशा चत्तर हिने डॉ.अब्दुल कलाम यांच्या चरित्राचे वाचन करून त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची ओळख करून दिली. पायल गडाख व श्रेया कडनर यांनी अनुक्रमे

'स -संविधानाचा' या पुस्तकाचे वाचन आणि पुस्तक परिचय सादर केला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी 'फिरती वाचन पेटी' हा उपक्रम वर्गावर्गात राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी वाचन वह्यांमध्ये पुस्तकांतील आशय, विचार व अनुभव लेखन केले. मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे, एस. एम. वाकचौरे व वसंत बोडखे, संजय शिंदे यांनी शिक्षक वाचनात सहभाग घेत विद्यार्थ्यांसमोर वाचनाचा आदर्श ठेवला.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी 'ग्रंथ हेच गुरू' या संकल्पनेवर आधारित वर्गसजावट केली. सुविचार, तोरण, फलकलेखन, मैदानावर विद्यार्थ्यांनी पुस्तकाची मानवी आकृती साकारत महावाचन, रांगोळी व रंगीबेरंगी फुग्यांनी वर्गाचे आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले. आरव कोटकर याने डॉ. कलाम यांचे छायाचित्र सुबकपणे रेखाटून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याच वेळी जागतिक हात धुवा दिनानिमित्त हात स्वच्छ धुण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. योग्य पद्धतीने हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून वैयक्तिक स्वच्छता व आरोग्यविषयक जागृती करण्यात आली.

'पुस्तके वाचू, विचार समृद्ध करू आणि ज्ञानाच्या प्रकाशाने जीवन उजळवू!' या प्रेरणादायी संदेशातून कार्यक्रमाने वाचनसंस्कृती जोपासण्याचा आणि स्वच्छतेची सवय अंगीकारण्याचा संदेश दिला. वाचन प्रेरणा दिनाचे नियोजन शिक्षक प्रतिनिधी विलास गायकवाड, बाळासाहेब पिंगळे व कलाशिक्षक सुनिल वाकचौरे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षिका श्रीम.प्रतिभा निर्गुडे, मंगेश गडाख, मच्छिन्द्र पवार, उज्वला देवके, महेश घुगे,श्रीम ज्योती फुलसौंदर ग्रंथपाल खंडू नवले,व बाबासाहेब गर्दे, स्वप्नील अत्रे आदि शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वाचन प्रेरणा दिन यशस्वी करण्यासाठी मौलिक प्रयत्न केले.

जोर्वेत थोरात-विखे समर्थकांत चकमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जोर्वे येथे पोल लावण्याच्या कारणावरून माजी मंत्री बाळासाहेब थोरात व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या समर्थकांमध्ये शनिवारी दुपारी जोरदार शाब्दिक चकमक उडाली. याबाबत माहिती अशी की, जोर्वे गावात वडगाव पान दत्त मंदिर रोडच्या मध्यभागी असलेला पोल विखेंच्या कार्यकर्त्यांनी काढला.

या ठिकाणी दुसरा पोल बसवण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या कारणावरून विरोध करण्यात आला. शनिवारी सायंकाळी माजी मंत्री थोरात यांचे कट्टर समर्थक शरद थोरात व पालकमंत्री राधाकृष्ण विखेचे समर्थक गोकुळ दिघे या दोघांत वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक चकमक होऊन हा वाद वाढत गेला. यामुळे दोन्ही बाजूचे समर्थक मोठ्या प्रमाणावर गोळा झाले. दोन्ही समर्थक एकमेकांवर धावून जात होते. त्यामुळे काही काळ तणाव होता.

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

संगमनेरमध्ये कुंकुमार्चन सोहळा व श्रीसूक्त पठण भक्तिमय वातावरणात

वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी०

संगमनेर : शारदीय नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य कुंकुमार्चन सोहळा व श्रीसूक्त पठणाचा धार्मिक कार्यक्रम अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या पहिल्या वर्षातील सोहळ्याला विविध समाजांतील महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. धार्मिक परंपरांचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि महिला सन्मानाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

आदिशक्ती जगदंबा व श्री महालक्ष्मी मातेच्या चरणी प्रार्थना अर्पण करून सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी श्रीसूक्त पठण करण्यात आले. महिला भगिनींनी भक्तिभावाने कुंकुमार्चन करत देवीची आराधना केली. धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसरात प्रसन्नतेचे वातावरण निर्माण झाले. या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विविध समाजांतील महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग. सर्वांनी एकत्र येत श्रद्धापूर्वक कुंकुमार्चन केले. धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा आणि परस्परांमधील स्नेहभाव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

महिलांचा सन्मान आणि धार्मिक-सांस्कृतिक कार्यात त्यांना सन्मानपूर्वक स्थान देण्याच्या भावनेतून प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित महिला भगिनींचा यथोचित मानसन्मान केला. शिस्तबद्ध नियोजन आणि सर्वांच्या सहकार्यामुळे हा सोहळा उत्साहात पार पडला.

कोणताही धार्मिक किंवा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी सामूहिक प्रयत्न आणि परस्पर सहकार्य महत्त्वाचे असते. या सोहळ्याच्या आयोजनासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसह नियोजन, मार्गदर्शन, आर्थिक मदत, साहित्य व्यवस्था आणि अन्य स्वरूपात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे योगदान मोलाचे ठरले.

कार्यक्रमाच्या यशात विविध संस्था, महिला मंडळे, समाजबांधव, ज्येष्ठ नागरिक, देणगीदार, हितचिंतक, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरला. कार्यक्रमाच्या यशाचे श्रेय एखाद्या व्यक्तीपुरते मर्यादित नसून, सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे असल्याची भावना प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आली. सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

धार्मिक परंपरांसोबत सामाजिक एकोप्याचा संकल्प

वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानचा उद्देश धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनाबरोबरच वैदिक परंपरांचे संवर्धन, धार्मिक संस्कारांची जाणीव, महिलांचा सन्मान आणि समाजातील विविध घटकांमध्ये एकोपा वाढविणे हा आहे. यापुढेही सर्वांच्या सहकार्याने धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबवून सेवाभाव व संस्कृती संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प प्रतिष्ठानने व्यक्त केला.

श्री महालक्ष्मी मातेच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्य नांदो, अशी प्रार्थना करीत प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या महिला भगिनींसह सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था, मंडळे, मान्यवर आणि कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात आले.





भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल
(रिलायन्स डिजीटल)
मध्ये ग्राउंड फ्लोअरचे
दोन शॉप किंवा ऑफिस
भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

२ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध!
पत्ता
SBI कॉलनीजवळ,
जनता नगर, संगमनेर
संपर्क क्रमांक:
9850569862
9834825883

पाहिजेत
अकाऊंटंट - २ जागा
कॅशिअर - २ जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाच हजारांची भीक नको, पीक नुकसानीची भरपाई द्या; किसान सभा

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी २६ ऑक्टोबरला वाहन मोर्चा



मुंबई : महाराष्ट्रातील ३०५ तालुक्यांत दुष्काळ घोषित करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर रुपये ५,००० अग्रिम मदत जमा केली जाईल, अशी घोषणा केली आहे. मात्र, ही मदत दुष्काळ संकटाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी आहे. पिके उभी करण्यासाठी शेतकऱ्यांनी खते, बियाणे, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. आता पिकांचे नुकसान झाल्याने कृषी सेवा केंद्रांचे दुकानदार उधारी वसूल करण्यासाठी तगादा लावत आहेत. दिवाळीपूर्वी ही उधारी फेडण्याचा दबाव शेतकऱ्यांवर आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांत उत्पादन खर्चही भरून निघणार नाही. अनुभव पाहता, अग्रिम मदत म्हणून जाहीर केलेली रक्कमच अंतिम मदत ठरण्याची शक्यता आहे. दुष्काळामुळे झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीची भरपाई न करता केवळ पाच हजार रुपये देणे म्हणजे शेतकऱ्यांच्या संकटाची थट्टा आहे.

नमो शेतकरी योजनेचे थकीत पैसे तातडीने द्या!

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून पात्र शेतकऱ्यांना वर्षाला रुपये ६,०००, तर महाराष्ट्राच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून आणखी रुपये ६,००० मिळतात. शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेचा आठवा हप्ता २५ मार्च २०२६ रोजी वितरित करण्यात आला. त्या वेळी ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबांच्या खात्यांवर रुपये १,७९८.७८ कोटी जमा करण्यात आले होते. त्यानंतर दुष्काळ असूनही अद्याप पुढील हप्ते देण्यात आलेले नाहीत. हे पैसे शेतकऱ्यांना का दिलेले नाहीत, याबाबत सरकार बोलायला तयार नाही. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे नववे आणि दहावे हप्ते रखडल्यामुळे पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी रुपये ४,००० मिळणे बाकी आहे. एकीकडे ४००० रुपये थकवायचे व दुसरे ५००० देऊन श्रेय घ्यायचे हे बरोबर नाही. आठव्या हप्त्याच्या वेळी सुमारे ८९ लाख ७५ हजार लाभार्थी गृहीत धरल्यास, दोन हप्त्यांची ही थकीत संभाव्य एकूण रक्कम सुमारे रुपये ३,५९० कोटी होते. सरकारने ही थकीत रक्कम अगोदर द्यावी व त्यानंतर ५०००/- रुपये अग्रिम दिल्याबद्दल पाठ थोपटून घ्यावी.

लाडकी बहीण योजनेतून सुमारे ८१ लाख लाभार्थी कमी!

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या सुमारे २.४७ कोटींवरून १.६६ कोटींवर आणली आहे. म्हणजे सुमारे ८१ लाख लाभार्थी कमी झाले आहेत. या योजनेत पात्र महिलांना दरमहा रुपये १,५०० दिले जातात. या आधारे ८१ लाख महिलांचा एका महिन्याचा हप्ता रुपये १,२१५ कोटी आणि बारा महिन्यांचा हप्ता रुपये १४,५८० कोटी होतो. लाभार्थी संख्या कमी होण्यामागे ई-केवायसी, पात्रता पडताळणी आणि इतर कारणे असल्याचे सरकारने सांगितले आहे. मग या पूर्तता करून घेऊन सरकार लाभार्थींना हे पैसे का देत नाही, हा सवाल आहे.

नुकसानभरपाईसाठी पीक विमा संरक्षित रक्कम हा आधार धरा

दुष्काळामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि इतर पिकांचे नुकसान झाले आहे. केवळ पाच हजार रुपये देऊन या नुकसानीची भरपाई होऊ शकत नाही. एन.डी.आर.एफ.च्या निकषाप्रमाणे शेतकऱ्यांना पिकांची नुकसानभरपाई न देता केवळ बियाणे, खते यांच्या नुकसानीची भरपाई दिली जाते. नवीन हंगामात पिके उभी करण्यासाठीची ती तुटपुंजी मदत असते. त्याशिवाय पिकांचे जे खरेखुरे नुकसान झाले आहे, ती रक्कमसुद्धा शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे. त्यासाठी त्या-त्या पिकांची प्रधानमंत्री पीक विमा योजनेत संरक्षित रक्कम जितकी आहे, तितकी रक्कम किमान भरपाई म्हणून शेतकऱ्यांना दिली पाहिजे. सरकार याबाबतही काहीच बोलायला तयार नाही.

कर्जमाफीची रक्कम न मिळाल्याने पुढील हंगामाचा प्रश्न

राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम प्रत्यक्ष जमा होण्यास विलंब होत आहे. नियमित कर्जदारांना केवळ ५० हजारांच्या अनुदानावर सीमित ठेवल्यामुळे त्यांच्यातही मोठा असंतोष आहे. कर्जमाफीची रक्कम जमा न झाल्यास शेतकऱ्यांना सहकारी बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडून पुढील हंगामासाठी पीक कर्ज मिळण्यात अडचणी येऊ शकतात. किसान सभेने या पार्श्वभूमीवर तीव्र आंदोलनाची घोषणा केली आहे.

किसान सभेच्या राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा- दुष्काळ, कर्जमाफी, पीक विमा, वनहक्क, देवस्थान, गायरान आणि इतर शेतकरी प्रश्नांवर अखिल भारतीय किसान सभेने या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. २६ ऑक्टोबर रोजी राज्यभरातील हजारो शेतकरी वाहन मोर्चाने अकोले येथून मुंबईच्या दिशेने मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्याच्या दिशेने रवाना होणार आहेत. मुंबईत पोहोचल्यावर २७ ऑक्टोबरपासून आझाद मैदान येथे महामुक्काम सत्याग्रह सुरू करणार असल्याचे डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, डॉ. अजित नवले, यशवंत झाडे, उमेश देशमुख यांनी सांगितले.

महावितरण कर्मचाऱ्यांना मारहाण

पुराव्यांअभावी पाच आरोपींची मुक्तता

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- वीजबिलांची थकबाकी असल्याने रोहित्र बंद ठेवल्याच्या कारणावरून महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण, दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणल्याच्या आरोपाखाली दाखल झालेल्या खटल्यात संगमनेरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. सरकारी पक्षाला आरोप सिद्ध करण्यात अपयश आल्याने हा निकाल देण्यात आला. तपासातील त्रुटी, साक्षीदारांच्या जबानीतील विसंगती आणि महत्त्वाचे पुरावे सादर न झाल्याचे मुद्दे या निकालात महत्त्वाचे ठरले.

अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथे १ मार्च २०१८ रोजी सकाळी मुळा नदीलगतच्या रोहित्र परिसरात ही घटना घडल्याचा आरोप होता. महावितरणचे साहाय्यक अभियंता विठ्ठल परशराम हारक आणि त्यांचे सहकारी वीजपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात तेथे गेले होते. शेतकरी ग्राहकांकडील वीजबिलांची थकबाकी असल्याने रोहित्र बंद ठेवण्यात आले होते. यावरून जमलेल्या नागरिकांनी रोहित्र तातडीने सुरू करण्याची मागणी केली. त्यातून वाद निर्माण होऊन काही जणांनी कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व मारहाण केली, तसेच मोबाईल फोन फेकून नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला होता.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने साक्षीदार आणि पुराव्यांच्या आधारे आरोप सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, उलटतपासणीदरम्यान अनेक त्रुटी समोर आल्या.

फिर्यादीने मोबाईल फोन फेकून तोडल्याचा आरोप केला होता. मात्र, या घटनेतील महत्त्वाचा साक्षीदार दिगंबर पगार याला न्यायालयात सरकारी साक्षीदार म्हणून तपासण्यात आले नाही. तसेच नुकसान झाल्याचे सांगितलेला मोबाईल फोन आणि घटनेच्या वेळचे व्हिडिओ फुटेजही पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आले नाही. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबानीत विसंगती आढळल्याने आणि स्वतंत्र साक्षीदारांकडून आरोपांना ठोस पुष्टी न मिळाल्याने सरकारी पक्षाची बाजू कमकुवत ठरली.

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि उपलब्ध पुराव्यांचे विश्लेषण केल्यानंतर न्यायालयाने आरोपींवरील आरोप सिद्ध झाले नसल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार सचिन बादशाह भोर, शिवनाथ रामभाऊ जगताप, विजय भाऊसाहेब चौधरी, गणपत शिवराम भोर आणि बादशाह भिका भोर या पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. २०१८ मध्ये घडलेल्या या प्रकरणाचा निकाल देताना न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे निर्णय घेतला. या निकालामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या खटल्याला पूर्णविराम मिळाला असून, पुराव्यांची गुणवत्ता आणि तपासातील त्रुटींचे न्यायालयीन प्रक्रियेत असलेले महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

सुकेवाडीच्या मंगेश शिंदे यांची महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल शुक्लेश्वर विद्यालयात सत्कार



सुकेवाडी (प्रतिनिधी) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून महसूल सहाय्यकपदी नियुक्ती झाल्याबद्दल शुक्लेश्वर विद्यालय, सुकेवाडी येथील माजी विद्यार्थी मंगेश बबन शिंदे यांचा विद्यालयाच्या वतीने गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी मिळवलेले यश परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व अभिमानास्पद ठरले आहे.

या सत्कार समारंभास स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य तथा माजी प्राचार्य भारत कुटे सर, गोरख सातपुते, रेवणनाथ शिंदे, सोन्याबापू सातपुते, डॉ. दत्तात्रय राऊत, विलास सातपुते, ग्रामस्थ मोहन सातपुते, अरुण शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मंगेश शिंदे यांचे आई-वडील, भाऊ, कुटुंबीय, ग्रामस्थ, विद्यालयाचे मुख्याध्यापक पानसरे सर, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बडे सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना भारतजी कुटे सर यांनी मंगेश शिंदे यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे विशेष कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीचा बाऊ न करता शिक्षणात सातत्य ठेवावे, ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम घ्यावेत आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून यशाची नवी शिखरे सर करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना मंगेश शिंदे यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, भाऊ तसेच विद्यालयातील शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाला दिले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. अपयश आले तरी खचून न जाता आत्मविश्वास, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर प्रयत्न सुरू ठेवावेत, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विलास सातपुते सर यांनी केले, तर ई. जे. भांड सर यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

माजी विद्यार्थ्यांने मिळवलेल्या या उल्लेखनीय यशामुळे शुक्लेश्वर विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, मंगेश शिंदे यांच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

युवा सेनेची गर्भवती महिलांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू

आमदार अमोल खताळ पाटील यांच्या हस्ते लोकार्पण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नवरात्रोत्सव म्हणजे शक्तीची उपासना, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि समाजाप्रती आपली बांधिलकी जपण्याचा उत्सव. याच भावनेतून आमदार अमोल खताळ पाटील यांच्या संकल्पनेतून युवा सेनेच्या वतीने गर्भवती महिलांसाठी मोफत आणि इतर रुग्णांसाठी अत्यल्प दरात रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम युवा सेनेच्या माध्यमातून होत आहे गर्भवती महिलांनी या मोफत रुग्णवाहिका सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन युवा सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त मालपाणी लॉन्स येथे आयोजित युवा सेनेच्या युवा जल्लोष दांडिया नृत्य कार्यक्रमात आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते या रुग्णवाहिका सेवेचे लोकार्पण करण्यात आले. गर्भवती महिलांना प्रसूतीच्या काळात रुग्णालयात सुरक्षित आणि वेळेवर जाण्यासाठी वाहन उपलब्ध व्हावे आणि गरजेच्या वेळी त्यांना मदत मिळावी, हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून युवा सेनेच्या वतीने ही मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली आहे.

नवरात्रोत्सव उत्सव फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू घटकांसाठी प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे करण्याचा युवा सेनेचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरत आहे. स्त्रीशक्तीचा जागर करणाऱ्या नवरात्रोत्सवात गर्भवती



महिलांसाठी आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारा ठरला असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले. यावेळी शिवसेना व युवा सेनेचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दांडिया नृत्य स्पर्धेने कार्यक्रमात उत्साहाची रंगत भरली. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेचे वातावरण चैतन्यमय झाले. या स्पर्धेत यश संपादन केलेल्या स्पर्धकांना आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ पाटील यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

५० वर्षांची पाणीटंचाई संपविली; सावरगाव घुलेची जलक्रांती

पाच दशकांच्या पाणी टंचाईवर ग्रामस्थांची एकजूट ठरली प्रभावी

संगमनेर प्रतिनिधी

पाणीटंचाई आली की टँकरची वाट पाहायची, पाण्यासाठी वणवण करायची आणि उन्हाळा आला की स्थलांतराची वेळ सहन करायची, हेच जणू सावरगाव घुलेच्या ग्रामस्थांचे वर्षानुवर्षांचे प्राक्तन बनले होते. १९७२ पासून म्हणजेच तब्बल ५० वर्ष पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या या गावाने अखेर लोकसहभाग आणि श्रमदानाच्या बळावर परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला.

सावरगाव घुलेचे सरपंच नामदेव घुले यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी एकत्र येत जलसंधारणाचा मार्ग स्वीकारला आणि पाझर तलावाची निर्मिती केली. या सामूहिक प्रयत्नांमुळे २०२४ पासून गावासह टाळूचीवाडी, आमलेवाडी आणि बेलसोंडा या वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची गरज भासलेली नसल्याचे ग्रामस्थ आनंदाने सांगत होते.

सावरगाव घुलेतील टाळुचीवाडी ही तर महाराष्ट्रात पहिल्यांदा पाण्याचे टँकर आणणारे गाव होते. यंदा राज्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही आगामी पावसाळ्यापर्यंत टँकरची



गरजच भासणार नसल्याचा आत्मविश्वासच ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. पाच दशकांच्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी गावातील लोकसहभाग आणि श्रमदानाचा हा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रासाठी आशेचा किरण ठरत आहे.

संगमनेर तालुक्यातील उंच पठारी, पर्जन्यछायेच्या आणि अवर्षणप्रवण भागात असलेल्या सावरगाव घुले व परिसरातील वाड्यावस्तीमध्ये दरवर्षी डिसेंबर जानेवारीत पाणीटंचाई तीव्र होत असे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत होती, तर काही कुटुंब पाण्याच्या अभावामुळे स्थलांतर होत असत. शासनाच्या विविध योजनांतून कामे होऊनही पाणी टंचाईचा प्रश्न पाचवीला पूजलेला आणि नित्याचाच होता. केवळ टँकरवरच अवलंबून राहून प्रश्न सुटणार नाही, हे ओळखून अखेर ग्रामस्थांनी पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत पाण्याची मुरवण वाढविणे, भूजलसाठ्याचे पुनर्भरण करणे यावर भर दिला. सन २०२३ ते २०२५ या कालावधीत लोकसहभागातून पाझर तलावाचे काम पूर्णपणे करण्यात आले.

नामदेव घुले यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली राजू घुले, बाबासाहेब कडू, मच्छिंद्र घुले, माजी सरपंच बाबाजी घुले, नितीन घुले, बाळासाहेब घुले, संतोष घुले, गोरक्षनाथ मदने नामदेव घुले, घामाजी भुतांबरे, लीला घुले, सीमा कडू, जिजाबा घुले, शंकर घुले, नवनाथ घुले, जालिंदर घुले, किरण घुले, राजेंद्र घुले, भाऊसाहेब घुले, विश्वनाथ घुले, बबन घुले, गणेश घुले, गोविंद घुले, यांच्यासह गावातील अनेक पुरुष, महिला युवकांनी या कामासाठी अथक परिश्रम घेत मोलाचे योगदान दिले. ग्रामस्थांची एकजूट, श्रमदानाची तयारी आणि पाण्याच्या प्रश्नाविषयीची सामूहिक तळमळ यामुळे जलसंधारणाचा हा उपक्रम प्रत्यक्षात उतरला. सावरगाव घुले गावाने ठरवले, ग्रामस्थ एकत्र आले आणि उपलब्ध साधन संपत्तीचे योग्य नियोजन आणि वापर केला तर पाणी टंचाई सारख्या गंभीर समस्येवरही मार्ग निघू शकतो. शासनाच्या योजनांना लोकसहभागाची जोड दिल्यास जलसंधारणाची कामे अधिक प्रभावी व परिणामकारक ठरू शकतात हे या गावाने दाखवून दिले आहे.

निर्माण झालेल्या या पाझरतलावामुळे पाण्याची उपलब्धता आणि भूजल पुनर्भरणाला मदत झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे पठार भागातील सावरगाव घुले, टाळूचीवाडी, आमलेवाडी आणि बेलसोंडा परिसरात टँकरवरील अवलंबित्व कमी झाल्याचा सकारात्मक बदल दिसत आहे. मात्र, हा बदल दीर्घकाळ टिकवण्यासाठी तलावातील गाळ काढणे, पाणीसाठ्याचे नियोजन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि नव्या जलसंधारण कामांना सातत्य देणे हेही तितकेच आवश्यक आहे. टँकरमुक्तीचा हा अनुभव केवळ एका गावाच्या यशाची कहाणी नसून, पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या इतर गावांसाठीही प्रेरणादायी दिशा आहे. इच्छाशक्ती, एकजूट आणि श्रमदान यांच्या जोरावर गावागावात जलसमृद्धी आणता येते हा विश्वास सावरगाव घुलेकरांनी आपल्या कृतीतून दाखवून एक प्रेरणादायी आदर्शच निर्माण केला आहे.

पान ५ वरून राज्यातील...

९९.५३ टक्के आणि भोजापूर धरणात ९४ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने नाशिक परिसरातील पिण्याच्या पाण्याबाबत सध्यातरी दिलासादायक स्थिती आहे.

उजनी, कोयना आणि इतर धरणांमध्येही चांगला साठा- राज्यातील प्रमुख धरणांमध्ये उजनी धरणात १०६.८५ टीएमसी म्हणजेच ९१.१३ टक्के, तर कोयना धरणात ९१.९५ टीएमसी म्हणजेच ८७.३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण समूहात २५.७१ टीएमसी म्हणजेच ८८.१८ टक्के साठा आहे.

विदर्भातील पेंच धरणात ४४.६४ टक्के, तर गोसीखुर्द धरणात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. कोकण विभागातील बहुतांश धरणे भरलेली असून, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या पाच प्रमुख धरणांमध्ये सुमारे ८६ टक्के आणि ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणात ९८.३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याचे चकोर यांनी सांगितले.

दुष्काळी मदत आणि पाणी आरक्षणाकडे लक्ष- राज्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पंचनामे आणि निकषांनुसार किती आर्थिक मदत मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची प्राथमिक मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याचा उल्लेखही चकोर यांनी केला. मात्र, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आणि पुरेशी आर्थिक मदत मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

जलसंपदा विभागाकडून ऑगस्ट २०२७ पर्यंतच्या पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाचे नियोजन करण्यात येत असल्याचे समजते. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन १६ ऑक्टोबरपासून धरणांतील १० टक्के पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय जाहीर झाल्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे हा राखीव साठा विचारात घेऊनच रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी सिंचनाचे नियोजन करावे लागणार आहे.



दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



सोमवार । १९/१०/२०२६

संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)

विजयादशमीच्या सर्वांना शुभेच्छा...



शहागड ऐतिहासिक महोत्सवासाठी ५० लाखांचा निधी मंजूर -आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथे नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित सप्ताहाला आ. खताळ यांनी भेट देऊन पेमादेवीची महाआरती केली. त्यावेळी भावीक भक्तांना मार्गदर्शन करताना म्हणाले की माझे आमदार होण्यापूर्वीपासूनच या परिसराशी जिव्हाळ्याचे नाते आहे. माझ्या आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या घडामोडींची सुरुवात या परिसरातून झाली आहे. त्यामुळे या भूमीच्या विकासासाठी काहीतरी भरीव योगदान देण्याची माझी प्रामाणिक इच्छा आहे. आमदार झाल्यानंतर शहागडाच्या विकासाचा विषय सर्व प्रथम विधिमंडळाच्या अधिवेशनात दोन-तीन वेळा मांडला. या गडाचा इतिहास सर्वदूर पोहोचला पाहिजे आणि या ऐतिहासिक वारशाला योग्य स्थान मिळाले पाहिजे, यासाठी सातत्याने प्रयत्न केले. ऋषिपंचमीच्या दिवशी दरवर्षी शहागडावर कार्यक्रम आयोजित केला जातो. मात्र याच ऋषिपंचमीनिमित्त शहागडावर होणाऱ्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यासाठी मुंबईला जावे लागले होते. या प्रयत्नांना यश मिळाले असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या माध्यमातून ऐतिहासिक महोत्सवासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र, हा निधी पुरेसा नसून, सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी मिळविण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगून ते म्हणाले या ऐतिहासिक शहा गडावर तीन ते चार दिवसांचा भव्य ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस असून, या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही शहागडावर आणण्याचा माझा प्रयत्न राहणार असून त्यांच्या माध्यमातून शहागडाचे ऐतिहासिक महत्त्व राज्यासह देशभर पोहोचविण्याचा आपला संकल्प असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

या शहागड परिसराचा इतिहास धार्मिक परंपरा आणि पर्यटन यांची सांगड घालून या परिसराचा विकास झाल्यास पेमगिरी सह आजूबाजूच्या गावांनाही त्याचा मोठा लाभ होऊ शकतो. परिसरात असलेले ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे महत्त्व लक्षात घेता पर्यटकांची संख्या वाढविणे, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि गावाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणे यासाठी आपला प्रामाणिक प्रयत्न सुरू असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

आपण या शहागडासाठी स्ट्रीट लाईट देण्याचा शब्द मागील वर्षी झालेल्या नवरात्र उत्सवाच्या कार्यक्रमात दिला होता तो यावर्षी पूर्ण केला आहे आपण जे बोलतो ते करतो या उक्तीनुसार दिलेला शब्द पूर्ण केला आहे. परंतु फक्त स्ट्रीट लाईट किंवा ब्लॉकचे काम करून आपण थांबणार नाही तर संपूर्ण परिसराचा नियोजनबद्ध विकास करायचा असल्याचा विश्वास आ. खताळ यांनी व्यक्त केला यावेळी महायुती कार्यकर्ते, पेमगिरी ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पेमगिरी गावाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणार

पेमगिरीचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याची बाब महायुतीचे दिलीप कोल्हे यांनी आमदार अमोल खताळ यांच्या निदर्शनास आल. त्यावर बोलताना ते म्हणाले कि या भागातील पाण्याचा प्रश्न तात्पुरत्या उपाययोजना करून सुटणार नाही. तर त्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करण्याची गरज आहे. मोरदरा पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र, पाऊस पडूनही पाण्याची साठवण योग्य पद्धतीने होत नसेल, तर पाणीटंचाई कायम राहते. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना या परिसराचा सर्वे करण्याबाबतच्या सूचना दिल्या असून पाणीसाठा वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास सुरू आहे. काही ठिकाणी आवश्यक ती कामे आणि निधी उपलब्ध झाल्यास पुढील काळात केवळ पिण्याच्या पाण्याचाच नव्हे तर शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सोडविणे शक्य होईल,निवडणुका आल्यावर आश्वासने देण्यापेक्षा कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न आहे. पेमगिरी परिसराचा पाणीप्रश्न सोडविण्याची जबाबदारी मी स्वीकारली असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

संगमनेरात गुटख्यावर पोलिसांचा छापा

१२ लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरमधील गुंजाळवाडी परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सकाळी छापा टाकून साडेसहा लाखांहून अधिक मूल्याच्या प्रतिबंधित गुटख्यासह तब्बल ११ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घाबत असताना, गुंजाळवाडी परिसरातील अरगडेमळा येथे एका ओम्नी गाडीतून सुगंधी तंबाखू व पानमसालाची अवैध वाहतूक होणार असल्याची गोपनिय माहिती पोलिस हेड कॉन्स्टेबल बाळासाहेब नागरगोजे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सकाळी पावणेदहा वाजण्याच्या सुमारास पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी ओम्नी गाडी आणि पाठीमागे येणारी होंडा ऍक्टिव्हा रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी मोटर सायकलस्वार पळून जाण्यात यशस्वी झाला, तर पोलिसांनी ओम्नी चालकाला ताब्यात घेतले तपासणीदरम्यान पोलिसांनी विमल पानमसाला, व्ही-वन तंबाखू, रजनीगंधा आणि तुलसी कंपनीच्या उत्पादनांसह ५ लाख रुपयांची ओम्नी गाडी व मोबाईल असा एकूण ११ लाख ८६ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.













